# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

दिनांक १०.०९.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि ०९/०९/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ०७ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ७,२५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.०९/०९/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयात एकुण ०५ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन ६६.७६ लिटर दारू व एक मोसा असा एकुण २८,८१०/—रू.कि.चा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत दि.०९/०९/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे गोरेगाव ०१,हिंगोली ग्रा.०१ अशा एकुण ०२ ठिकाणी छापा टाकुन आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व एक मोबाईल व नगदी असा एकुण ३,२१०/—रू माल जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**मरणास कारणीभुत असणा—या विरूध्द अपराध दाखल** :—:—दिनांक ०९/०९/२०२२ रोजी फिर्यादी दौलत मारोती रेंगे रा रेणकापुर ता वसमत जि हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे वसमत ग्रा.येथे कलम २७९,३३७,३३८ ,३०४अ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.२१.०८.२०२२ रोजीचे १७.३० वा जवळा खंदारबनच्या पुढच्या नदिच्या पुलाच्या थोड समोर आईलमिल जवळ मयत हा दि.२१.०८.२२२ रोजीचे १७.३० वा च्या सु त्याची मोसा क्र एमएच ३८ क्यु ५५८१ हिरो पॅशनवर बसुन वसमत येथुन रेणकापुर येथे येत असतांना जवळा खंदारबनच्या पुढच्या नदीच्या समोरील आईमिल जवळ हयगईने व निष्काळजीपणे चालवुन स्वता मोटारसायकल वरून पडल्याने हाताला पायाला खांदयाला व डोक्याला गंभीर मार लागुन उपचारा दरम्याण सरकारी दवाखना विष्णुपुरी नांदेड येथे दि.२५.०८.२०२२ रोजी सकाळी १०.४५ वा मरण पावला व स्वत:चे मरणास कारणीभुत ठरला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात वसमत ग्रा.पोलीस तपास करित आहेत.

**चोरी** :—दिनांक ०९/०९/२०२२ रोजी फिर्यादी संजय बालासाहेब नायक वय ३३ व्य.खाजगी ड्रायव्हर रा सवना ता सेनगाव जि हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे गोरेगाव येथे कलम कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.०१.०९.२०२२ रोजीचे रात्री २३.३० वा ते दिनांक ०२.०९.२०२२ रोजीचे सकाळी ४.०० वा मौजे सवना येथे अज्ञात आरोपीने फिर्यादीचे प्लॉटचे बाजुस रोड लगत फिर्यादीने उभे केलेल्या छोटा हत्ती टाटा एस वाहणाची ॲमरॉन कंपनीची बॅटरी चोरून नेली म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात गोरेगाव पोलीस तपास करित आहेत.

दिनांक ०९/०९/२०२२ रोजी फिर्यादी दिनेश शिवप्रसाद सातपुते व्य.मेडीलकल चालक जात क्षत्रिय रा मोंढा रोड वसमत यांचे फिर्यादी वरून पोस्टे वसमत शहर येथे कलम ४५४,३८० भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.०६.०९.२०२२ रोजीचे ८.१४ वा ते ८.१६ वा दरम्याण शरण्या मेडीकल मोंढा रोड वसमत येथे अज्ञात आरोपीने शरण्या मेडीकल याचे आपात्कालीन खिडकीतुन अनाधिकृत रित्या आतमध्ये प्रवेश करून गल्ल्यातील १४३३० रू चोरून नेले आहे म्हणुन गुन्हा दाखल दाखल होवुन या संदर्भात वसमत शहर पोलीस तपास करित आहेत.